महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीम
अंमलबजावणीमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या
शासकीय अधिकाऱ्यांना सन्मानपत्र देवून गौरविणे.

**महाराष्ट्र शासन**
गृह विभाग
शासन निर्णय,क्रमांक-तंमुगा १००९/सीआर-३४/पोल-१५,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक - ६ मे, २००८.

GMGT050801

**वाचा-** शासन निर्णय, क्रमांक एमआयएस १००७/सीआर-२३८/पोल-८, दिनांक १९ जुलै,२००७.

**शासन निर्णय**- दिनांक १९ जुलै, २००७ च्या शासन निर्णयान्वये दिनांक १५ ऑगस्ट, २००७ पासून राज्यात महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीम सुरु करण्यात आली आहे. या मोहिमेत व्यापक लोकसहभाग अपेक्षित असून, मोहिमेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांनी प्रभावीपणे कार्य करण्याची आवश्यकता आहे. महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीम आपल्या कार्यक्षेत्रामध्ये प्रभावीपणे राबविण्यासाठी उक्त दिनांक १९ जुलै, २००७ च्या शासन निर्णयान्वये जिल्हास्तरीय कार्यक्रम समिती, तालुकास्तरावरील समिती व पोलीस ठाणेस्तरावरील समिती अशा समित्या अनुक्रमे जिल्हाधिकारी, तहसीलदार व पोलीस ठाणे प्रमुख यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आल्या आहेत. या समित्यांमधील अधिकाऱ्यांनी आपल्या कार्यक्षेत्रामध्ये महात्मा गांधी तंटा मुक्त गाव मोहिमेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी तंटामुक्त गाव समितीस येणाऱ्या सर्व अडचणीचे निराकरण करुन त्यांना त्यांच्या कार्यासाठी प्रोत्साहन द्यावयाचे आहे. तसेच विभागीय आयुक्त आणि विशेष पोलीस महानिरीक्षक (परिक्षेत्रे) यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रात मोहिमेच्या अंमलबजावणीचा वेळोवेळी आढावा घेवून प्रभावी अंमलबजावणी करावयाची आहे. नेहमीच्या प्रशासकीय कामकाजापेक्षा या मोहिमेतील कामकाज हे वेगळया स्वरुपाचे असल्याने प्रशासकीय व पोलीस यंत्रणेस व्यापक लोकसंवाद साधून सर्मपितपणे काम करावे लागणार आहे. त्या दृष्टीने मोहिमेत सर्वोत्कृष्ट कार्य करणाऱ्या प्रशासकीय व पोलीस अधिकारी/कर्मचा-यांना सन्मानपत्र देवून गौरविण्याचा शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे:-

१) **महसुली विभाग**- राज्यातील सहा महसुली विभांगांपैकी ज्या महसुली विभागात महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेची सर्वोत्कृष्ट अंमलबजावणी होईल म्हणजेच त्या विभागातील एकूण ग्रामपंचायतींच्या तुलनेत सदर मोहिमेच्या अंमलबजावणी वर्षात तंटामुक्त गावांची टक्केवारी सर्व विभागांपेक्षा अधिक असेल अशा विभागाच्या विभागीय आयुक्तांना त्यांनी केलेल्या सर्वोत्कृष्ट कार्याबद्दल सन्मानपत्र प्रदान करण्यात येईल.

२) **पोलीस परिक्षेत्र**- राज्यातील सात पोलीस परिक्षेत्रांपैकी ज्या पोलीस परिक्षेत्रामध्ये महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेची सर्वोत्कृष्ट अंमलबजावणी होईल म्हणजेच त्या परिक्षेत्रातील एकूण ग्रामपंचायतींच्या तुलनेत सदर मोहिमेच्या अंमलबजावणी वर्षात तंटामुक्त गावांची टक्केवारी सर्व परिक्षेत्रांपेक्षा अधिक असेल अशा पोलीस परिक्षेत्राच्या विशेष पोलीस महानिरीक्षकांना सन्मानपत्र प्रदान करण्यात येईल.

३) **जिल्हा** - राज्यातील प्रत्येक महसुली विभागातून त्या महसुली विभागात असलेल्या जिल्ह्यांपैकी ज्या जिल्ह्यात महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेची सर्वोत्कृष्ट अंमलबजावणी होईल म्हणजेच त्या जिल्हयातील एकूण ग्रामपंचायतींच्या तुलनेत सदर मोहिमेच्या अंमलबजावणी वर्षात तंटामुक्त गावांची टक्केवारी त्या विभातील इतर जिल्ह्यांपेक्षा अधिक असेल अशा जिल्ह्याचे जिल्हाधिकारी व जिल्हा पोलीस अधीक्षकयांना सन्मानपत्र प्रदान करण्यात येईल.

४) **तालुका** - राज्यातील प्रत्येक जिल्हयातून ज्या तालुक्यांमध्ये महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेची सर्वोत्कृष्ट अंमलबजावणी होईल म्हणजेच त्या तालुक्यातील एकूण ग्रामपंचायतींच्या तुलनेत सदर मोहिमेच्या अंमलबजावणी वर्षात तंटामुक्त गावांची टक्केवारी त्या जिल्ह्यातील इतर तालुक्यांपेक्षा अधिक असेल अशा तालुक्याचे तहसीलदार यांना सन्मानपत्र प्रदान करण्यात येईल.

५) **पोलीस स्टेशन** - राज्यातील प्रत्येक जिल्हयातील ज्या पोलीस ठाणे कार्यक्षेत्रात महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेची सर्वोत्कृष्ट अंमलबजावणी होईल म्हणजेच त्या पोलीस ठाणे परिक्षेत्रातील एकूण ग्रामपंचायतींच्या तुलनेत सदर मोहिमेच्या अंमलबजावणी वर्षात तंटामुक्त गावांची टक्केवारी त्या जिल्ह्यातील इतर पोलीस ठाणे परिक्षेत्रांपेक्षा अधिक असेल अशा पोलीस ठाण्याचे प्रमुख यांना सन्मानपत्र प्रदान करण्यात येईल.

२. वरील सन्मानपत्रासाठी पात्र अधिकारी/कर्मचाऱ्यांची निवड खालील समिती मार्फत करण्यात येईल:-

१) मा.उपमुख्यमंत्री (गृह) - अध्यक्ष
२) मा. मंत्री (महसूल) - सदस्य
३) मा.राज्यमंत्री (गृह) - सदस्य
४) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य - सदस्य
५) अपर मुख्य सचिव (गृह) - सदस्य
६) अपर मुख्य सचिव (महसूल) - सदस्य
७) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य - सदस्य
८) प्रधान सचिव (विशेष) गृह विभाग - सदस्य
९) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय - सदस्य
१०) उप/सह सचिव, गृह विभाग - सदस्य सचिव

३. प्रस्तुत सन्मानपत्रासाठी पात्र अधिकाऱ्यांची निवड करण्याकरीता आवश्यक सर्व माहिती पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई हे एकत्रितरित्या प्राप्त करुन घेऊन दिनांक १५ जुलैपूर्वी शासनास सादर करतील.

४. सदर शासन निर्णय राज्य शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २००८०५०६१४०५२५००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

मा.आ.गुट्टे

(मा.आ. गुट्टे)
अवर सचिव, गृह विभाग, महाराष्ट्र शासन.

प्रति,
मा. राज्यपाल यांचे सचिव,
मा. मुख्यमंत्री यांचे सचिव,
मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव,
सर्व मा. मंत्री यांचे खाजगी सचिव,